# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 07 January 2026
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक ०७ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या प्रचाराने वेग घेतला आहे. मुख्यमंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस आज लातूरमध्ये येत असून, टाऊन हॉल इथं त्यांची जाहीर सभा होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख उपमुख्यमंत्री अजित पवार आज पुण्यात शिवाजीनगर, कसबा, कोथरुड, पर्वती परिसरात रोड शो च्या माध्यमातून प्रचार करत आहेत.

शिवसेना नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज अकोल्यात प्रचारसभा होणार आहे.

**

कोल्हापुरात आज काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा खासदार शाहू छत्रपती आणि आमदार सतेज पाटील यांनी प्रसिद्ध केला. नागरिकांसाठी अनेक महत्त्वाच्या योजना आणि आश्वासनांचा समावेश या जाहीरनाम्यात करण्यात आला आहे. तातडीची दहा हजार रुपयांची वैद्यकीय मदत, स्मार्ट वाहतूक आणि पार्किंगची सोय, आंतरराष्ट्रीय दर्जाचं क्रीडा संकुल, प्रभावी कचरा व्यवस्थापन, पंचगंगा नदी प्रदूषण नियंत्रण, अंबाबाई तिर्थक्षेत्र विकास आराखडा यासह “कोल्हापुरी चप्पल”ची पारंपरिक ओळख जपण्यावर भर आणि विमानतळाचं नामकरण छत्रपती राजाराम महाराज यांच्या नावावर करण्याचा प्रस्तावाचा या जाहीरनाम्यात समावेश करण्यात आला आहे.

**

जालना महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रशासन सज्ज असून, खबरदारी म्हणून अनेक उपाय केले जात आहे. त्यामध्ये परवानाधारकांकडे असलेली शस्त्रे निवडणूक काळात परत मागवण्यात आली आहेत. आचारसंहिता लागू झाल्यापासून ते आतापर्यंत एकूण २४५ पैकी २१४ शस्त्रे, परवानाधारकांनी विविध पोलिस ठाण्यात जमा केली आहे. ही शस्त्रे त्यांना निवडणूक संपल्यानंतर परत मिळणार असल्याचं, मनपा कार्यालयाकडून कळवण्यात आलं आहे.

**

लोकशाही बळकट करण्यासाठी मतदानाचं प्रमाण वाढायला हवं, या उद्देशानं धुळे शहरात आज महापालिकेतर्फे मतदान जनजागृती फेरी काढण्यात आली. यावेळी अहिराणी भाषेत घोषणा देऊन मतदारांमध्ये जनजागृती करण्यात आली.
चंद्रपूर शहरातही आज मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली.

****

भारतीय रेल्वे आता जगातल्या सर्वात मोठ्या प्रमाणावर विद्युतीकरण झालेल्या रेल्वे प्रणालींपैकी एक बनली आहे. देशात सुमारे ७० हजार किलोमीटर ब्रॉडगेज मार्गावर रेल्वेगाड्या विजेवर धावत आहेत आणि रेल्वे जाळ्यापैकी ९९ टकक्याहून अधिक भागाचं विद्युतीकरण पूर्ण झालं आहे. २००४ ते २०१४ दरम्यान दररोज दीड किलोमीटर मार्गाचं विद्युतीकरण होत असताना, मागील सहा वर्षांत हा वेग वाढून दररोज १५ किलोमीटरवर पोहचला आहे. तसंच रेल्वे सौर उर्जेचा व्यापक वापर करत असून, नोव्हेंबर २०२५ पर्यंत सौर ऊर्जा क्षमता सुमारे ९०० मेगावॅटवर पोहोचली आहे. भारतीय रेल्वेची ही पर्यावरणपूरक, आधुनिक आणि शाश्वत दिशेने वाटचाल होत असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

छत्तीसगडमधल्या सुकमा जिल्ह्यात आज २६ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं असून, त्यामध्ये सात महिलांचा समावेश आहे. या नक्षलवाद्यांवर एकूण ६४ लाख रूपयांचे बक्षीस होते. हे नक्षलवादी सुकमा, ओडिशा आणि माड परिसरात सक्रिय होते.

****

भारतीय अंतराळ संशोधन संस्था – इसरो येत्या १२ जानेवारीला पीएसएलव्ही–सी 62 उपग्रहाचं प्रक्षेपण करणार आहे. आंध्रप्रदेशातील श्रीहरिकोटा इथंल्या सतीश धवन अंतराळ केंद्रावरून सकाळी १० वाजून १७ मिनीटांनी या उपग्रहाचं प्रक्षेपण केलं जाणार असल्याचं इसरोनं समाज माध्यमावरच्या संदेशात सांगितलं. या उपग्रहासोबतच विविध भारतीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांचे १८ लहान उपग्रह देखील अंतराळात सोडले जाणार असल्याचं संस्थेनं म्हटलं आहे.

****

भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने त्यांच्या अखत्यारित असलेल्या १७० स्मारके आणि संग्रहालयांसाठी ऑनलाईन तिकिट नोंदणीसाठी ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स ची सुरुवात केली आहे. यामुळे एएसआयची तिकीट प्रणाली खुल्या डिजिटल नेटवर्कवर स्थलांतरित झाली असून, पर्यटकांना विविध ॲप्समधून तिकीट आरक्षित करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. यामुळे सोयीस्कर, वेगवान आणि सुरक्षित बुकिंग प्रक्रिया राबवण्यास मदत मिळणार असल्याचं सांस्कृतिक मंत्रालयानं म्हटलं आहे.

****

संस्कार भारतीतर्फे देण्यात येणारे २०२५ चे अखिल भारतीय भरतमुनी सन्मान पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. लोककला आणि दृश्यकला या विभागातल्या कलाकरांना हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार येतात. यंदा लोककला विभागात छत्तीसगढ इथंल्या वेदमती शैलीतील प्रख्यात पंडवानी गायिका प्रभा यादव तसंच दृश्यकला विभागात पुण्यातले, सुप्रसिद्ध चित्रकार चिंतामणी हसबनीस यांना गौरवण्यात येणार आहे. येत्या एक फेब्रुवारीला ठाणे इथं या पुरस्कारांचं वितरण होईल.

****

उत्तर भारतात थंडीची लाट कायम असून, दिल्ली, उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, राजस्थान आणि मध्य प्रदेशसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे.

****